Review of Research
International Online Multidisciplinary Journal

ISSN : 2249-894X    Impact Factor 3.1402 (UIF)    Volume -5 | Issue - 6 | March - 2016

# लघु उद्योग गृहउद्योग आणि स्वयंरोजगार वृद्धिंगत होण्यासाठी नागपूर जिल्हयातील महिला सहकारी पतसंस्थांचा कार्यात्मक अध्ययन



कु. मेघा ज्ञानेश्वर खोब्रागडे[१] , डॉ.राजीव सातोकर[२]
[१]संशोधनकर्ती.
[२]मार्गदर्शक , प्राचार्य, एम.कॉम.,एम.फील.,पीएच.डी. नबीरा कॉलेज, काटोल.

## सारांश

सर्वसामान्य परिस्थितीत असलेल्या महिलांना आर्थिक मदत करण्यासाठी महिला सहकारी पतसंस्थांची स्थापना झालेली असते आणि या पतसंस्थेद्वारे महिला सभासदांना कर्जाच्या स्वरूपात पैसा प्राप्त करता येतो. महिला सहकारी पतसंस्थेमुळे बचत व काटकसरीच्या कामाला चालना मिळून कर्जविषयक गरज भागविली जाते. तसेच लघुउद्योग, कुटीरउद्योग व स्वयंरोजगाराला देखील कर्जपुरवठा प्राप्त होण्यास मदत होते. त्यामुळे महिलांच्या विकासात महिला सहकारी पतसंस्था हे विकासाचे एक साधन बनत आहे. महिलांचा आत्मविश्वास व आत्मनिर्भरता वाढत आहे. व्यापारी बँका मोठ्या कर्जदारांसाठी ज्या सेवा पुरवितात त्या सर्व सेवा महिलांसाठी महिला सहकारी पतसंस्थांनी पुरवाव्यात आणि त्यातून स्वत:चा विकास घडवून आणावा, यासाठी देखील या पतसंस्थांचे अध्ययन महत्वपूर्ण वाटते.

महिला सहकारी पतसंस्थांची स्थापना करून महिलांचा विकास त्याद्वारे होऊ शकतो, यावर संशोधिकेचा एक महिला म्हणून ठाम विश्वास आहे आणि म्हणूनच महिलांच्या विकासात महिला सहकारी पतसंस्थांचे योगदान तपासून पाहण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

## प्रास्ताविक

सहकारी तत्त्वांवर कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थेला सहकारी पतसंस्था असे म्हणतात. सहकारी पतसंस्था ग्रामीण आणि नागरी अशा दोन्ही क्षेत्रात असतात. परंतु नागरी पतसंस्थांचे प्रमाण अत्यल्प असल्याने, सहकारी पतसंस्थेच्या कार्याचा जेव्हा अभ्यास केला जातो तेव्हा अभ्यासकाला बहुधा ग्रामीण सहकारी पतसंस्था अभिप्रेत असते.

प्राथमिक सहकारी पतसंस्था ग्रामीण स्तरावर शेतीसाठी कर्जपुरवठा करते. भारतात सहकारी पतपुरवठ्याची जी त्रिस्तरीय रचना आहे, त्यातील सर्वात खालच्या म्हणजे ग्रामीण स्तरावर प्राथमिक पतसंस्था कार्य करीत असते. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाच्या समस्येवर तोडगा म्हणून सहकारी पतसंस्थांची सुरूवात झालेली दिसते. शेतकऱ्यांना केवळ कर्जाऊ पैशाचा पुरवठा करणाऱ्या संस्था निर्माण करून कर्जबाजारीपणाचा प्रश्न कायमचा निकालात निघणार नव्हता. पैशाच्या पुरवठ्याबरोबर काटकसर करून अनुत्पादक गोष्टींवर पैसा न उधळण्याची सवय त्यांना लावणे तितकेच आवश्यक होते. म्हणूनच ज्यातून शेतकऱ्यावर सामूहिक जबाबदारी येऊन पडेल व त्यातून काटकसरीची सवय आपोआप त्यांना लागेल, अशा पतसंस्था सहकारी तत्त्वांवर सुरू करण्याचा विचार पुढे आला. आज सहकारी पतपुरवठा हे भारतातील सहकारी आंदोलनाचे सर्वात प्रमुख अंग होऊन बसले आहे.

## महिला आणि विकास :

अतिप्राचीन आणि प्राचीन काळी मानवाधिकारांसाठी कुठल्याही कायदेशीर मसुद्याची गरजच नव्हती. परंतु त्यानंतर मध्ययुगातील बदललेल्या वातावरणाने व विविध राष्ट्रांच्या एकमेकांवरील अतिक्रमणाने ही गरज भासू लागली. विशेषत: जगात ठिकठिकाणी पाश्चात्त्य राष्ट्रांकडून ज्या वसाहती निर्माण झाल्या त्यामुळे मूलभूत हक्क दाबले गेले, यातूनच अनेक उठाव झाले आणि शेवटी अनेक वर्षांनी काही नैसर्गिक, मूलभूत गोष्टींसाठी आणि हक्कांसाठी कायद्याच्या आधाराने सनद बनवावी लागली. याचबरोबर वाढते शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यामुळेही महिलांच्या अधिकारांची मोठ्या आणि भयावह प्रमाणात गळठेंची होऊ लागली. भारतीय समाजात स्त्रीचे स्थान दुय्यम स्वरूपाचे आहे. या देशातील स्त्री पुरूषांची गुलाम आहे. तिला समाजात स्वतंत्र असे स्थान मुळीच नाही. ती स्वत:च्या गुणाने समाजात ओळखली जात नाही; तर या देशातील स्त्री कोणाची मुलगी असते, सून असते, पत्नी असते किंवा आई तरी असते.

पहिल्या महायुद्धानंतर एकेकट्या राष्ट्राकडून महिला आणि मानवाधिकारांचे संरक्षण होऊ शकत नाही, या विचारानुसार अनेक देशांनी पुढाकार घेऊन जगातील पहिला आंतरराष्ट्रीय संघ स्थापन केला. त्यालाच 'लीग ऑफ नेशन्स' किंवा 'राष्ट्रसंघ' म्हणून ओळखले जाते. मात्र यात महिला आणि मानवाधिकार वेगळे मांडलेले नव्हते. १९१८ साली आंतरराष्ट्रीय कामगार संघटना स्थापन झाली आणि कामगारांच्या हितासाठी २० व्या शतकात सुरूवातीपासूनच प्रयत्न सुरू झाले. याच दरम्यान जगात पहिल्यांदा इंग्लंडमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला. त्यानंतर जगात अनेक ठिकाणी महिलासंबंधी तसेच गुलामगिरीवर आश्रितांसाठीच्या प्रश्नांवर आंतरराष्ट्रीय परिषदा झाल्या. १९४५ साली संयुक्त राष्ट्र संघ स्थापन झाला. यात प्रथमच महिलांचे अधिकार आणि मानवाधिकारांविषयी कायदेशिररीत्या स्पष्टपणे बोलले गेले. १० डिसेंबर, १९४८ रोजी, त्याचा कायदेशीर

मसुदा अस्तित्वात आला. यात त्यानंतर परिणामकारकरीत्या प्रगती झाली. त्याचा संपूर्ण जगभर प्रसार झाला. त्यातूनच महिलांच्या कार्यक्षेत्रात अनेक विकास झाले. म्हणूनच आज प्रत्येक स्त्री स्वतंत्रपणे, मोकळेपणाने स्वतःच्या मूलभूत हक्कांचा आग्रह धरून मोकळा श्वास घेऊन जगू शकते.

## महिला उद्योजक :

स्त्री विकासाचा पाया घालणाऱ्या, स्त्री शिक्षणासाठी समाजाचा रोष पत्करणाऱ्या, दगडशेणाचा मारा खाणाऱ्या सावित्रीबाईच्या आणि महात्मा फुले यांच्या ध्यासामुळे आज साऱ्याजनी हातात लेखनी धरू शकतात. स्त्री शिक्षणाच महत्त्व सावित्रीबाईनी सुमारे सव्वाशे वर्षापूर्वीच उमगल होत. स्त्री शिक्षण असो, विधवांचे केशवपण असो, स्त्रीभ्रूण हत्येसारखा महद पाप असो, सावित्रीबाईनी त्याकाळी या गोष्टींचा विरोध केला होता त्यामुळे स्त्री शिक्षणासाठी सर्वस्व झोकून देणाऱ्या सावित्रीबाई कायम स्मरणात राहतात.

स्त्रिया शिकल्या आणि क्रांती घडून आली. आजच्या स्त्रीने खूप प्रगती केली आहे. आज तिच्या जगण्याला दिशा आहे, तिला स्वविचार आहे. सबलीकरण, सक्षमीकरण आणि स्वयंनिर्भरता हे शब्द आता परवरलीचे झाले आहेत. महिलांचे सक्षमीकरण म्हटल की ते मानसिक आणि आर्थिक असे दोन पातळ्यावर म्हणता येईल. स्त्रियांना स्वविकासाची संधी मिळाली, जर आर्थिक उन्नतीचे स्तर उपलब्ध झाले तर समाजाच्या आर्थिक उलाढालीत त्या भर घालू शकतात, हे आता वेगळ्याने सिद्ध करण्याची गरज राहिलेली नाही. महिला सक्षमीकरणाचा एक निर्देशांक म्हणजे स्थावर मालमत्तेवर तिच नाव असणं आणि ती आर्थिकदृष्टया स्वावलंबी असणं होय. हे लक्षात आल्याने घरातील पत्नीचा हक्क मुलींचा वारसा हक्क कायद्याने मान्य करण्यात आला आहे, ही बाब स्तुत्य आहे. १९८५ नंतर नोकरीनिमित्त बाहेर पडणाऱ्या स्त्रियांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. कला, साहित्य, शिक्षणच नव्हे तर विविध प्रांतात स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. मिळालेल्या संधीचे सोने महिलांनी केल्याचे आपल्याला त्यांच्या सर्वच क्षेत्रातील प्रगतीवरून दिसून येईल. विकासाच्या प्रक्रियेत महिलांच योगदानही तितकच प्रभावी आहे. १९९४ मध्ये महिला धोरण जाहीर करून त्याची अंमलबजावणी करणारा महाराष्ट्र हे देशातील पहिल राज्य ठरलं आहे. त्यानंतर २००१ मध्ये या धोरणात सुधारणा करण्यात आली.

स्त्रियांचा विकास आणि सक्षमीकरण जेव्हा आपण म्हणतो तेव्हा स्त्रियांच्या आत्मशक्तीचा विकास, तिची आर्थिक उन्नती, तिची सर्वांगीण प्रगती आणि घरच्यांच पाठबळ अशा अनेक गोष्टी यामध्ये अंतर्भूत असतात. महिला आणि उद्योगक्षेत्रातील तिच योगदान पाहता भारत सरकार आणि विकास आयुक्त यांनी केलेल्या अहवालानुसार २००५-०६ मध्ये असा निष्कर्ष काढला की, भारतात महिला उद्योजकांची एकूण संख्या १७,६९,२८५ एवढी आहे. देशातील एकूण लघुउद्योगांच्या १२.३३% एवढी ही संख्या आहे. यापैकी सुमारे १७% उद्योग लघुउद्योग क्षेत्रात नोंदलेले असून उर्वरीत ८३% उद्योग नोंदणी नसणाऱ्या क्षेत्रात आहेत.

भारतातील स्त्री उद्योजकतेचा गुणात्मक विचार केला तर, स्त्री उद्योजकतेच्या युगाचा आरंभ आता होऊ लागला आहे. आज मध्यम व छोटया उद्योगांमध्ये भारतीय स्त्रिया आता जास्त दिसू लागल्या आहेत. निर्मिती क्षेत्रात अजूनही स्त्री उद्योजक तितक्याशा दिसत नाहीत. भारतीय समाजातील एकूणच

कुटुंब रचना, समाजाच्या विशिष्ट चालीरिती आणि धारणा या सर्व गोष्टीतून स्त्रियांना एकूणच त्यांच्या करिअरचा मार्ग धुंडाळावा लागत आहे. पूर्वी यशस्वी उद्योजकांच्या मागे घरातील स्त्री असायची पण आता तिच स्त्री उद्योजकाची भूमिका पार पाडण्यासाठी पुढे आलेली दिसते.

केवळ स्वयंपाकघरातील खाद्यपदार्थ उत्पादन व विक्री किंवा काही विशिष्ट व्यावसायिक क्षेत्रे एवढेच तिचे क्षितीज मर्यादित राहिलेले नाही. याचा परिणाम म्हणून भारत सरकारला १९९१ च्या नवीन औद्योगिक धोरणात स्त्रियांच्या उद्योजकतेबाबत स्वतंत्रपणे विचार करावा लागला आहे. १९९१ नंतर स्त्री उद्योजकांना सरकारने अनेक सोयी सवलती दिल्या आहेत. त्याचा लाभ घेऊन सुद्धा स्त्रिया स्वतंत्रपणे अथवा भागीदारीत व्यवसाय सुरू करू शकतात. जिल्हा उद्योग केंद्राच्या मार्फत अनेक कर्जपुरवठ्याच्या योजना, स्त्री उद्योजकांना कर्जपुरवठा व प्रशिक्षणासाठी वयाची अट शिथिल केली जाते. उद्योजकता विकास कार्यक्रम, राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँकानी स्त्रियांसाठी खास स्त्री उद्योजकांसाठी विशेष कर्जयोजना सुरू केल्या आहेत. सरकारी अनुदानही स्त्री उद्योजकांना मिळते.

## निष्कर्ष,

महिला सहकारी पतसंस्थांच्या योगदानामुळे महिला उद्योजकांच्या विकासात भर पडला का? हे पडताळून पाहण्यासाठी निवडण्यात आलेल्या नमुन्यातील एकूण ५०% लघु उद्योग करणाऱ्या महिलांना त्यांचा पतसंस्थेत सहभाग घेण्याअगोदर व घेतल्यानंतर झालेल्या विकासाबद्दल विचारण्यात आले. त्यावरून महिला उद्योगजकांच्या विकासात महिला सहकारी पतसंस्थांचे योगदान फार महत्त्वाचे ठरले.

## संदर्भ ग्रंथ सूची


- जरारे विजय लक्ष्मण, २००४, संशोधन प्रणाली, अद्वैत प्रकाशन, अकोला.
- कऱ्हाडे बी. एम. २००७, शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लीशर्स, नागपूर.
- घाटोळे रा.ना., २००३, समाजशास्त्रीय संशोधन – तत्वे व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर .
- आगलावे प्रदिप, २000, संशोधन पध्दतीशास्त्रे व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर .
- भांडारकर पु. ल., सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर ढृ
- गुप्ते ए.के., १९९७, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६0 व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१, मुकुंद प्रकाशन, ठाणे.
- जोशी व. शं., जोशी प.व., कायमखाने ली. कृ., १९९४, सहकारी संस्था अधिनियम, १९६0, न्यायदीप प्रकाशन, पुणे – १६.
- नंदा अमित, २०१५, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६0, करंट पब्लिकेशन्स, मुंबई ४0000२.
- नागरी / ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांसाठी सुधारित आदर्श – उपविधी, २00३, ललित गांधी, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. मुंबई, प्रशासकीय कार्यालय, – ताराराणी चौक, कोल्हापूर, ४१६00२.

❖ कामत गो. स., मेमोरिया सी.बी., १९७५, सहकार तत्व आणि व्यवहार, किताब महल, १५ थार्नहिल रोड, औरंगाबाद.
❖ जाधव बी.एस., १९९९,सहकारी बँका व पतसंस्था कर्जपुरवठा : एक दृष्टीकोन,जामदार प्रकाशन, सातारा.
❖ महाजन मुकुंद, १९९६, सहकार चळवळ, निराली प्रकाशन, पुणे.